असा. १६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, एप्रिल २०, २००७ / चैत्र ३०, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.**—महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. .. .. .. .. .. .. **पृष्ठे १९१-१९२**

दिनांक १९ एप्रिल २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २० एप्रिल २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम).

**महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५, (२००६ चा महा. २१.) यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



[**किंमत :** रुपये १.००]

भाग चार--३३

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १ मध्ये, पोट-कलम (३) मधील, परंतुकातील, " आणि अखिल भारतीय सेवेतील महाराष्ट्र संवर्गाच्या अधिकाऱ्यांना प्रकरण तीन, लागू होणार नाही " हा मजकूर वगळण्यात येईल. २००६ चा महा. २१.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ४ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (५) मधील, " लगतपूर्व, बदली करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेऊन " या मजकुराऐवजी, " बदली करणाऱ्या लगत वरिष्ठाच्या मान्यतेने " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ६ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मधील तक्त्यामध्ये,—

(क) नोंद (ख) मधील स्तंभ (१) मध्ये, " आणि गट ' ब ' मधील सर्व अधिकारी " या मजकुराऐवजी, " आणि गट ' ब ' मधील सर्व राजपत्रित अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) नोंद (ग) मधील स्तंभ (१) मध्ये, " गट ' क ' मधील सर्व कर्मचारी " या मजकुराऐवजी, " गट ' ब ' व ' क ' मधील सर्व अराजपत्रित कर्मचारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १० ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (२) मधील, " आणि असा शासकीय कर्मचारी, " या मजकुरानंतर, " अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६९, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई